Golden Research Thoughts
ISSN 2231-5063

Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 3 | Sept - 2015

# स्त्रीमुक्ती चळवळ व अहिंसा विचार




**रायते तेजश्री विष्णु**
नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फलटण (जि.सातारा)

**प्रस्तावना :**

स्त्री शिक्षण, त्याचा विकास, सध्याच्या काळात मांडला जाणरा स्त्रीवाद यांबद्दल भाष्य करण्याचा हा विषय नाही, तर स्त्री शिक्षणाची वास्तवदर्शी बाजू व स्त्रीमुक्ती चळवळ व स्त्रियांवर होणारी हिंसक आक्रमणे ह्या एकूणच सामाजिक परिवर्तनातील खराखुरा व्यवहारिक चेहरा समोर यावा या उद्देशाने हा निबंध लिहिला.



**स्त्रीमुक्ती चळवळ - उदय -**

स्त्री शिक्षणाचे खरे प्रणेते महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले हेच आहेत यात दुमत नाही. त्यामुळे शिक्षणाविषयीचे त्यांचे योगदान प्रस्तुत करण्याची गरज नाही.

युनाइटेड नेशन्स ऑर्गनायझेशन (UNO) या संस्थेद्वारा १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय स्त्री वर्ष म्हणून घोषित करण्यात आले. त्यानंतरचे दशक म्हणजे १९७५-१९८५ पर्यंतचा काळ हा भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीच्या संदर्भात बराच क्रियाशील होता१ असे म्हणावे लागेल. त्यानंतर ही चळवळ पुन्हा ९१ च्या दशकापासून जोम धरु लागली व आजमितीला ती झपाट्याने चालू आहे. स्त्रीमुक्ती चळवळ ही संकल्पना म्हणजे पाश्चिमात्य जगातून आयात केलेले एक 'फॅड' असून फार तर उच्चवर्गीय कुटुंबातील किंवा उच्च मध्यमवर्गातील स्त्रियांपुरतीच ही चळवळ फॅशनच्या स्वरुपात अस्तित्वात आहे, इतरांचे याच्याशी काही देणे-घेणे नाही असे कित्येकांचे म्हणणे आहे. विशेषतः काही पुरुषांच्या दृष्टिकोनातून हा चेष्टेचा विषय बनलेला आहे.

**स्त्रीमुक्ती चळवळ : स्वरुप-**

स्त्रियांच्या संदर्भातील जो मतदानाचा अधिकार भारतीय स्त्रीला सहज प्राप्त झाला त्याच अधिकारासाठी पाश्चात्य स्त्रीला संघर्ष करावा लागला. मतदानाचा हक्क, वडिलोपार्जित संपत्तीचा हक्क, शिक्षणाचा हक्क, घटस्फोटाचा हक्क, हुंडा विरोधी हक्क असे अनेक हक्क तिला प्राप्त आहेत, तरीही या समाजात जीवन जगण्याचा हक्क तिच्याकडून हिरावून घेतला जात आहे आणि या एकाच हक्कासाठी स्त्रीमुक्ती चळवळ आता नव्याने संघर्ष करु लागली आहे.

स्त्री ही घरात, समाजात सर्वत्र पूज्य आहे. ज्या समाजात ती पूज्य मानली आहे, त्याच समाजात हुंडाबळी, आंतरजातीय विवाह, बलात्कार, एकतर्फी प्रेम, ॲसिड हल्ला यांसारख्या तीव्र गुन्ह्यांमधून तिचा खून केला जात आहे व या सोशिकतेच्या, करुणेच्या नम्रतेच्या, कष्टकरी मूर्तीच्या जीवनाचाच अंत केला जात आहे. त्यामुळे खरे तर तिच्या जगण्यासाठीची, शिक्षणासाठीची ही चळवळ आहे. परंतु 'पुरुष विरुद्ध स्त्री' - असे युद्धाचे स्वरुप नकळतच या चळवळीला लागले आहे.

**स्त्रीमुक्ती चळवळी संदर्भात हिंसा/अहिंसा विचार-**

हिंसा/अहिंसा या संदर्भात स्त्री संबंधी विचार करण्याची वेळ येते तेव्हा हा विचार उपरेपणनेच झालेला दिसून येतो. स्त्रियांकडे हिंसाचाराला बळी ठरणरा घटक म्हणून पाहिले जाते किंवा मनुष्याच्या अनेक जैविक कार्यापैकी 'प्रजोत्पादन' हे एक

नैसर्गिक कार्य तिला पार पाडावे लागते. त्यामुळे स्त्रियांची जननक्षमता कळीची मानून सरसकट सर्व स्त्री जीवनाकडे कनवाळू संगोपक या भूमिकेतूनच पाहिजे जाते. मातृस्वरुपी स्त्री अहिंसेचे मूर्त उदाहरण होते तर हिंसा ही अधिकृत केली जात नाही. चंडी, दुर्गा अशा स्वरुपात स्त्री-प्रतिमा उभी केली जाते. हिंसाचाराचा उद्रेक अधिकाधिक तीव्र होत चाललेला आहे व रोज मरे त्याला कोण रडे असे जगणे जगत असताना पृथ्वीच्या कानाकोप-यातून स्त्रियांच्या वाट्याला येणारा हिंसाचार आणि त्या संदर्भातील कृती अधिक खोलात अधिक सम्यक स्वरुपात केली पाहिजे असा रेटाही स्त्रीवादातून निर्माण होत आहे, ही जमेची बाब आहे.

**भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीचे कार्य-**

भारतात १९७४-७५ च्या सुमारास स्त्री चळवळ ही स्त्रियांच्या वाट्याला येणा-या हिंसेच्या संदर्भात उभी राहिली. ती सुरुवातील 'हुंडाबळी' या संकल्पनेत नवविवाहितांच्या उघड-उघड केल्या जाणा-या खुनांच्या धक्कादायक वास्तवाला शह देण्यासाठी १९८०-८१ नंतर स्त्री-अत्याचार विकोपाला गेला व मथुरा, माया, त्यागी यांसारख्या बलात्काराच्या रुपात स्त्री अत्याचाराचे स्पष्ट दिसणरे हिडीस स्वरुप स्त्री-चळवळीने जगापुढे आणले२ आणि खरोखरच अशा समाजापुढे येणा-या व भितीपोटी दाबून ठेवल्या जाणा-या कित्येक हिंसक घटनांना या चळवळीने वाचा फोडली. त्यानंतरच्या काळात सती प्रथेचे होणारे पुनरुज्जीवन आणि गौरवीकरण, अर्भकावस्थेतील मुलींना मारुन टाकणे-हे प्रकार आजपर्यंत सर्रास आपल्याला पाहायला मिळत होते. १९८० ते ९० या काळात स्त्रियांवरील हिंसाचाराच्या विरोधात जी मोहीम हाती घेतली गेली त्याला प्रतिसाद म्हणून नवा कायदा कागदावर अवतरला. मात्र या कायद्यामध्ये अनेक त्रुटी व पळवाटा होत्या३.

संस्कृतीच्या क्षेत्रातील नियम व संकेतांमध्ये स्त्रियांच्या हिंसाचाराला अधिकच मान्यता मिळाली. हुंडाबळी सारखे गुन्हे समाजामध्ये चट्कन समोर आणले जातात. परंतु आंतरजातीय विवाह या संदर्भात सांस्कृतिक नितिनियम ओलांडल्यानंतर होणा-या ज्या हिंसा आहेत, त्यांकडे मात्र स्त्रीवादी अभ्यासकांनी अगदी अलिकडच्या काळात लक्ष वेधले. कुटुंबातील कर्ते म्हणवणारे पुरुष तया तरुण मुला-मुलींना सहज कौशल्याने संपवितात व हा कुटुंबाचा खाजगी मामला आहे असे म्हणून गुपचूप सहीसलामत त्यांतून बाहेर सुद्धा पडतात.

**स्त्रीमुक्ती चळवळ : यश, परिणाम व योजना-**

भारतात १९९०-९५ च्या सुमारास या चळवळीच्या प्रभावामुळे स्त्रियांच्या वाट्याला येणा-या हिंसेच्या संदर्भात झालेली वाढ अभ्यासकांनी लक्षात घेऊन चळवळीचे स्वरुप अतिसूक्ष्म केले. स्त्रीभ्रूणहत्या ही हिंसा असून त्यात होणारी वाढ लक्षात घेऊन कठोर पावले उचलली गेली४. २०१०-११ पासून त्यानंतर होणारी कारवाई म्हणून हिंसा कायद्यात बदल करुन थांबविली जाण्याचा प्रयत्न झाला व आज अखेर याच स्त्रीमुक्ती चळवळीवचा झालेला परिणाम म्हणजे स्त्री-भ्रूण बालिकावस्था व किशोरवयीन तसेच मध्यम वयातील स्त्रियांच्या होणा-या हिंसा थांबविल्या जाऊ लागल्या.

आज स्त्रियांचे व्यासपीठ म्हणून स्त्रियांना येणा-या समस्या व त्यातून होणा-या उपाययोजना या सर्वांची चर्चा केली जाते. चाच चळवळींमधून 'लेक लाडकी' अभियानाअंतर्गत स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण कमी झालेले आपणास पाहावयास मिळते.

स्त्री जातीचे दैव-धर्म यांचे नाते मोठे विचित्र आहे. कधी देवी कधी दासी अशी ही स्त्री जिला परमेश्वरानेही कनिष्ठ लेखले आहे. जो कोणी म्हणते देवतास्वरुप तर कोणी साक्षात्कारी स्त्रीला संत ही पदवी देतो, स्त्रीने पुरुषजातीच्या सेवेत आज्ञेतच राहायला हवे, कारण तिचा रक्षणकर्ता पुरुष आहे अश त-हेने जगभराच्या धर्मांनी आणि पर्यायाने देवानीही स्त्रीला कनिष्ठच लेखले आहे.

**समारोप-**

शहरांपासून दूर असलेली खेडी आणि वस्त्या व तेथे असणा-या स्त्रिया कित्येक शतकांनी जगाच्या मागे आहेत. अशा भागात काम करणा-या कार्यकर्त्यांची गरज आहे. कित्येक वर्षे दास्यात अडकून पडलेल्या स्त्रियांचे पाश आता कुजू लागले आहेत. येणा-या परिस्थितीशी हातमिळवणी करुन त्यांचे मनोधैर्य कमी झाले आहे व याचे कारण म्हणजे होणा-या आत्महत्या. त्यांच्या भितीपोटी त्यांना मारुन टाकण्यात येते. या हिंसेत वाढच होत चालली आहे. म्हणूनच स्त्रियांना गुलाम म्हणून वागवता येणार नाही, कारण स्त्री हीच खरी रक्षणकर्ता आहे. भारतीय चळवळीने आता ग्रामीण भगाचा ध्यासही घ्यायला हवा. स्त्री चळवळ ही शोषण विरोधी लढ्याचा एक अविभाज्य भाग असल्याने सभोवताली चाललेल्या लढ्याबद्दल अधिक संवेदनशील राहून इतर शोषितांच्या चळवळीशी तिने दृढ अनुबंध निर्माण केले तरच सर्वंकष परिवर्तन घडवून स्वतंत्र व निर्भय समाजजीवन निर्माणाचे ध्येय गाठणे स्त्री चळवळीला शक्य होईल.

**संदर्भ ग्रंथ-**

१.परामार्श खंड, २८ अंक ३, नोव्हें.-जाने.२००६-०७, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, तत्त्वज्ञान विभाग, पृ. २५ ते ३३
२.परमार्श खंड २२, अंक २-३, ऑगस्ट-जाने. २००१, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, तत्त्वज्ञान विभाग, पृ. १४८
३.डॉ. पेंडसे संदीप, 'स्त्रिया आणि अस्मितेचे राजकारण' वार्षिक स्त्री उवाच १९९२, पृ. ३३ ते ३५
४.डॉ. रेगे शर्मिला, 'प्रेमाचा अधिकार आणि हिंसेचा प्रश्न', सत्यशोधक विद्यार्थी संघटना प्रकाशन, पुणे, ऑगस्ट २०००.



**रायते तेजश्री विष्णु**
नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फलटण (जि.सातारा)